# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### नांदेड जिल्ह्यातील गोदावरी नदीवरील बाभळी बंधा-याच्या बॅकवॉटरवर उपसाजलसिंचन योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(१) १००६६ (०७-०४-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील गोदावरी नदीवरील बाभळी बंधा-याच्या बॅकवॉटरवर कुंडलवाडी शेळगाव चन्नापूर व पाटोदा माष्टी ता.बिलोली या दोन उपसाजलसिंचन योजना कार्यान्वित करुन त्याद्वारे कुंडलवाडी परिसरातील पाच मालगुजारी तलावामध्ये साठवण करण्याबाबतचा प्रस्ताव अधिक्षक अधियंता पाटबंधारे मंडळ नांदेड यांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असलयास, सदर प्रस्तावावर शासनाने काय निर्णय घेतलेला आहे वा घेणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०२-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

तथापि, अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड कार्यालयाचे दि. १५/०९/२०१२ व पत्रान्वये विषयांकित प्रकरणाचा प्राथमिक अहवाल जिल्हाधिकारी, नांदेड यांना सादर करण्यात आला.

तसेच महामंडळाचे दि. ०२/१२/२०१३ च्या पत्रान्वये याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे.

(२) व (३) सदर योजना जलसंपदा विभागाच्या मालकीच्या नाहीत. सदर योजना कुंडलवाडी विविध सहकारी संस्था व शंकर सहकारी कारखाना यांनी संयुक्तपणे केलेल्या आहेत. त्यामुळे प्रस्तावित कामे सुध्दा त्यांचे मार्फतच पुर्ण होणे आवश्यक आहे.

---

**आकोट (जि.अकोला) तालुक्यांत पठार नदीचा सातपुडा पर्वतातुन उगम होत असल्याने नदिकाठच्या शेकडो एकर शेजमीनितील पिकांचे नुकसान होत असल्याबाबत**

**(२) १३५३४ (०८-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकोट (जि.अकोला) तालुक्यांत पठार नदीचा सातपुडा पर्वतातुन उगम होत असल्याने नदिकाठच्या शेकडो एकर शेतजमीनितील पिकांचे अतोनात नुकसान होते तथापी नदीवर धरण बांधुन पाणी अड्वून होणा-या नुकसानीतून शेतक-यांना सुटका मिळेल याकरिता जिल्हाधिकारी अकोल, उपविभागीय अधिकारी लघु सिंचन, अकोट, अधिक्षक अभियंता पाटबंधारे मंडळ अकोला यांना दिनांक ५ ऑक्टोबर, २०१३ व १२ ऑक्टोबर, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान तसेच मा.मुख्यमंत्री, मा.जलसंपदा, मंत्री यांना दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास वारंवार निवेदने पाठपूरावा करुनही अद्याप कुठलीच कारवाई झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शेतक-यांना न्याय मिळावा पिकाचे नुकसान पुरस्थितीत होऊ नये या दृष्टीने संबंधितांवर विभागाने शासन स्तरावर पाठपूरावा करुन योग्य कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, येथील बाधीत शेतक-यांना दरवर्षी शेतात पाणी घुसून लाखो रुपये पिकांची हानी झाल्याने पठार नदी व टूमनी नदीचे पुरग्रस्त शेतक-याला दिलासा मिळण्याच्या हेतूने धरण अथवा नीदीचे पात्र सरळीकरण, खोलीकरण व रुंदीकरण अश्या पध्दतीचा प्रस्ताव शासननाच्या विचाराधीन आहे काय वा तयार करण्यात येत आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०२-२०१६) :** (१) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त नाही. तथापि अकोट तालुक्यात मौजे सावरगांव चे वरील बाजूस स्थानिक नाल्यावर पठारेअनाला बृहत ल.पा. योजनेस दि. १८.२.२००९ रोजी प्रशासकीय मान्यता दिली होती. तथापि, जनविरोधामुळे सदर योजनेचे काम हाती घेणे शक्य झालेले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) अकोट जिल्हा अकोला तालुक्यातील पठार नदी व टुगनी नदीच्या धरण अथवा नदी पात्र सरळीकरण, खोलीकरण व रुंदीकरण अशा पध्दतीची मागणी जलसंधारण विभागास प्राप्त झालेली नाही. तसेच अशा पध्दतीचा प्रस्ताव जलसंधारण विभागाकडे प्रस्तावित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपळधारा या गावाचे पुनवर्सन करण्याबाबत**

**(३) १४८४३ (०८-०४-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लखमापूर (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील लखमापूर सिंचन योजना ८ ते १० वर्षापासून मंजूर झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे काम पूर्ण होणे करीता पिपळधारा या गावाचे पुनर्वसन लवकरात लवकर करण्याची मागणी दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास लोकप्रतिनिधीनी मा. मंत्री यांच्याकडे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपळधारा या गावाचे पुनवर्सन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) होय, लखमापूर लघु पाटबंधारे प्रकल्पास शासन निर्णय दिनांक २५/७/२००५ नुसार प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

(२) होय.

(३) प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रामध्ये पिपळधरा गाव पूर्णत: बाधित होत असून बाधित गावाच्या पुनर्वसनाकरीता पर्यायी गावठाणासाठी १७.१४ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात आली आहे. प्रकल्पाचा पुनर्वसन आराखडा मंजूरीच्या प्रक्रियेत आहे. बुडीत क्षेत्रातील पिंपळधरा गावठाणाच्या भूसंपादनाची भूअर्जन अधिकारी लघु सिंचन कामे, नागपूर यांचे मार्फत कार्यवाही सुरु आहे. नविन गांवठाणाकरीता लागणाऱ्या जमीनीचा मोबदला रु. ५.३७ कोटीचा भरणा महसूल विभागाकडे करण्यात आलेला आहे. नगर रचनाकार कडून नवीन गावठाणातील पुनर्वसनाकरीता अभिन्यास मंजूर झालेला आहे. पुनर्वसनाकरीता लागणाऱ्या नागरी सुविधांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून मंजूरीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोसेखुर्द प्रकल्पा अंतर्गत घोडाझरी वितरिकेच्या काम वाटपाच्या करारनाम्यात गैरप्रकार झाल्याबाबत

**(४) १५३३५ (०९-०४-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसेखुर्द प्रकल्पा अंतर्गत घोडाझरी वितरिकेवर १४०० कोटी खर्च झाल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही योजना बंद करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बंद करण्यात आली असल्यास १४०० कोटी खर्च करण्याची आवश्यकता होती काय,

(४) तसेच १४०० कोटीचे काम वाटप करण्यात आले व त्यातील करारनाम्यात मोठया प्रमाणात गैरप्रकार झाल्याची तक्रार शासनाकडे करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०९-२०१५) :** (१) नाही. गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत घोडाझरी शाखा कालवा व त्या अंतर्गत वितरण व्यवस्थेवर मार्च १५ पर्यंत ८४४.११ कोटी खर्च झाला आहे.

(२) नाही, तथापि उपलब्ध निधीचा विचार करता सदर शाखा कालव्याचे कामास अग्रक्रम दिलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) नाही. घोडाझरी शाखा कालवा गोसीखुर्द प्रकल्पाचा भाग आहे. घोडाझरी शाखा कालव्याबाबत वेगळी तक्रार नाही. मात्र एकूण गोसीखुर्द प्रकल्पाबाबत झालेल्या तक्रारीचे अनुषंगाने चोकशी करण्यासाठी शासनाने श्री. वडनेरे, निवृत्त प्रधान सचिव यांची एक सदस्य समिती नियुक्ती केली होती. सदर चौकशी अहवालात घोडाझरी शाखा कालव्याचे निविदा स्विकृती दरम्यान निविदा किंमत अद्यावत करताना झालेल्या अनियमिततेचा उल्लेख आहे.

(५) वडनेरे समीतीच्या अहवालानुसार १५ अधिकाऱ्यांवर शासनाने दोषारोपपत्र बजावले असून विभागीय चौकशीची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

---

**गोंदिया पाटबंधारे विभागांतर्गत अनेक अनावश्यक कामांसाठी करारनामे जास्तीच्या भावाने देण्यात आल्याबाबत**

**(५) १५५८२ (०७-०४-२०१५). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया पाटबंधारे विभागांतर्गत अनेक अनावश्यक कामांसाठी करारनामे चढ्या भावाने देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शासनाचे लाखो रुपयाचे नुकसान झाले आहे या अनावश्यक कामांची मंजूरी स्वतंत्रपणे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमानूसार १० लाख रुपयांपेक्षा कमी असलेले करारनामे ३३:३३:३४ च्या अनुषंगाने मंजूर सहकारी संस्था, बेरोजागर अभियंता किंवा स्वतंत्र निविदा प्रक्रियेच्या माधमातून प्रक्रिया सुरु करण्यात येणार होते परंतू विभागाद्वारे सर्व कामे मजूर सहकारी संस्थांच्या माध्यमातून वाटप करण्यात आल्याने स्थानिक बेरोजगार अभियंता व पंजीकृत अभियंता यांच्यावर अन्याय झालेला आहे यासाठी या प्रकरणी चौकशी करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) अद्याप, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०९-२०१५) :** (१) नाही.

खरीप सिंचनाचा व विधानसभा निवडणुकीचा कालावधी एकच होता. या कालावधीत गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया यांनी ३१ करारनामे सिंचनासाठी आवश्यक असलेल्या कामांकरीता केले आहेत. ही सर्व कारानामे चढया भावाने करण्यात आलेली नसून अंदाजपत्रकीय दराने करण्यात आली आहेत.

(२) नाही.

खरप हंगामातील सिंचनाची निकड लक्षात घेता, विभागीय स्तरावर करारनामे करण्यात आली आहेत. करारनामे अंदाजपत्रकीय दराने करण्यात आली असल्याने शासनाचे नुकसान झालेले नाही.

(३) व (४) खरीप हंगामातील सिंचनाची निकड लक्षात घेता सदर कामे विभागीय स्तरावर, मजूर सहकारी संस्थाकडून करुन घेण्यात आली आहे.

याबाबत विभागास विचारणा करुन खुलासा मागविण्यात आला आहे. अनियमितता आढळून आल्यास चौकशीची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील नायगांव पंचायत समितीच्या गैर कारभाराबाबत**

**(६) १६९३४ (१७-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील नायगांव पंचायत समितीचा कारभार दिवसेंदिवस ढासळत चालले असून येथील गटविकास अधिकारीच कामावर उपलब्ध राहत नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान तसेच संबंधित विभागातील इंदिरा आवास घरकुल योजनेसाठी दाखल केलेल्या फायली या कार्यालयातून अचानक गायब होत असल्याने लाभार्थ्यांना आर्थिक लाभापासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, दोषींवर कारवाई करण्याबाबत व लाभार्थ्यांना इंदिरा आवास घरकुल योजनेचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-१२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) संबंधित लाभार्थ्यांना कामाप्रमाणे निधी देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोधडी परिसरातील (जि.नांदेड) येथील उमरवाडी ते डोंगरगाव (चि.) कच्च्या रस्त्यामुळे गावातील दळणवळण सेवा बंद झाल्याबाबत**

**(७) १७४४० (१४-०८-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोधडी परिसरातील (जि.नांदेड) येथील उमरवाडी ते डोंगरगाव (चि.) याठिकाणी ३०० लोकवस्तीचे आदिवासी जमातीचे गाव असून येथे असलेल्या कच्च्या रस्त्यामुळे गावातील दळणवळन सेवा बंद झाली असून शेतक-यांना खत किंवा इतर धान्य विक्रीसाठी बाजारपेठेत नेण्यासाठी डोक्यावर किंवा बैलगाडीच्या सहाय्याने आणावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी असलेल्या नागरीकांची समस्या लक्षात घेता उमरवाडी ते डोंगरगाव या रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१२-२०१५) :** (१), (२) व (३) होय. प्रश्नांकित रस्ता रस्ते विकास आराखडा २००१-२०२१ मध्ये समाविष्ट नसल्यामुळे काम प्रस्तावित करता आलेले नाही. आराखडयामध्ये समाविष्ट करण्यासाठी सदरील रस्त्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड यांच्याकडे जिल्हा परिषदेमार्फत सादर करण्यात येत आहे. रस्ता योजनेत समाविष्ट करुन त्यानंतर जिल्हास्तरीय योजनेमधून निधीच्या उपलब्धतेनुसार प्रश्नांकित रस्त्याचे काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**राधानगरी, गगनबावडा व पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील धामणी धरणाचे काम पूर्ण करण्यासाठी निधी मिळण्याबाबत**

**(८) १८५०१ (१४-०८-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर जिल्ह्यातील धामणी धरणाचे काम सिंचन गैरव्यवहाराच्या चौकशीमुळे तसेच निधी अभावी प्रलंबित असून प्रकल्प खर्च ६५० कोटी पर्यंत वाढला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी, गगनबावडा व पन्हाळा तालुक्यातील कोरडवाहू क्षेत्रात वरदान ठरणा-या धामणी धरणाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदर धरणाचे काम पुर्ण झाल्यास ३.८५ टीएमसी पाणी अडविण्यात येणार असून १४०० हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या धरणावर आतापर्यंत किती खर्च झाला आहे व सदर प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदरहू धरणाचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०९-२०१५) :** (१) नाही.
(२) या प्रकल्पामध्ये धरण, सिंचन तथा विद्युत विमोचक व सांडवा तसेच १० कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांच्या समावेश आहे. १० कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यापैकी ५ कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांची कामे यापूर्वीच पूर्ण झाली आहेत.
या धरणाचे सुमारे ७५ % काम पूर्ण झाले आहे.
(३) होय.
(४) या प्रकल्पावर रु. २९५.०४ कोटी खर्च झाला आहे. तसेच सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात या प्रकल्पाकरिता रु. २.८० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.
(५)१) खाजगी जमिनीचे भूसंपादन व पुनर्वसन कामे प्रगतीपथावर आहे.
२) प्रकल्पास सुधारित प्रशासकीस मान्यतेकरिता प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीस सादर करण्यात आला असून, शेरे पूर्ततेची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावरुन प्रगतीपथावर आहे.
(६) या प्रकल्पाच्या विलंबास मुख्यत्वे, वनक्षेत्राचे संपादन, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन इ. बाबी कारणीभूत आहेत.

---

### मालवण-देवगड (जि.सिंधुदुर्ग) मार्गावरील चिंदुर-कुडोपी तसेच चिंदर नागोचीवाडी या जोडरस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(९) १८९२७ (१७-०८-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण-देवगड (जि.सिंधुदुर्ग) मार्गावरील चिंदुर-कुडोपी तसेच चिंदर नागोचवाडी या जोडरस्त्यांची दुरावस्था झाल्याने वाहन चालकांसह विद्यार्थी व ग्रामस्थांचे प्रवासादरम्यान हाल होत असल्याने चिंदर-नागोचीवाडी युवक मंडळ, मुंबई यांच्या वतीले जिल्हयाचे मा.पालकमंत्री यांच्याकडे माहे एप्रिल, २०१५ वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या दहा वर्षापासून सतत जि.प. बांधकाम विभाग, मालवण यांच्याकडे रस्ता दुरुस्त करण्याबाबत मागणी करुनही कोणतीच कार्यवाही केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१२-२०१५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) "चिंदर कंडोपी" रस्ता हा प्रजिमा १८ या दर्जाचा असून त्याची लांबी एकूण १३.५५० कि.मी. एवढी आहे. हा रस्ता डांबरी पृष्ठभागाचा असून वाहनमार्ग ३.७५ मी. रुंदीचा आहे. सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात १४/०० ते १५/०० (प्रत्यक्षात कि.मी ३/०० ते ४/०० व गट "ई" पुरहानी कार्यक्रमामध्ये ०/०० ते ३/०० मधील पृष्ठभागावर डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले असून ४/५०० ते ५/०० मधील पृष्ठभाग अंशत: खराब व कि.मी. ५/६०० ते ५/७०० मधील पृष्ठभाग खराब झालेला आहे. उर्वरित रस्त्याचा पृष्ठभाग सुस्थितीत आहे. खराब पृष्ठभागाचे काम शासन निकष व निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

चिंदर नागोची वाडी रस्ता हा ग्रामीण मार्ग ३१ दर्जाचा असून लांबी ०.६५० किमी असून डांबरी पृष्ठभाग खराब आहे. विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम जिल्हापरिषदेमार्फत निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेऊन पूर्ण करण्याचा प्रयत्न राहील.

---

### खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रस्त्यांच्या कामांसाठी निधी मिळण्याबाबत

**(१०) १८९३१ (१७-०८-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील जामगे बौध्दवाडी ते राजापूरेवाडी, तिसंगी गितेवाडी ते धनगरवाढी, अस्तान धनगरवाडी ग्राममंदिर ते कॉजवे, धवडे सुतारवाडी, आंबचे नातूनगर, आंबये बुरटेवाडी, घेरापालगड शिंदेवाढी ते मोरवाडी, दहिवली बापकोळ, चाटव धनगरवाडी रस्त्यांना २०१५ मध्ये शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासकीय मान्यता देऊनही कामांना अद्यापी निधी तरतूद करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सस्त्यांच्या कामांना त्वरित निधी मिळण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे तसेच जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१२-२०१५) :** (१) तिसंगी गितेवाडी ते धनगरवाडी रस्ता व चाटव धनगरवाडी या दोन योजनाबाह्य रस्त्यांना लेखाशिर्ष २५१५ इतर ग्रामीण विकास कार्यक्रम सन २०१४-१५ अंतर्गत प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) प्रशासकिय मान्यता दिलेल्या कामांना निधीची तरतूद करण्यात आली आहे.

(३) व (४) आस्तान धनगरवाडी ग्राममंदिर ते कॉजवे ग्रा.मा. २८४ रस्ता व आंबये नातुनगर ग्रा.मा. ५४ या दोन रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे जिल्हा वार्षिक योजना आरखडा सन २०१५-१६ मध्ये प्रस्तावित करण्यात आले असून सदर आराखडा मंजूरीसाठी जिल्हा नियोजन समिती रत्नागिरी यांच्याकडे जिल्हा परिषदेमार्फत सादर करण्यात आला आहे.

प्रश्नांकित ९ रस्त्यांपैकी रस्ते विकास आराखड्यामध्ये समाविष्ट ३ रस्त्यांच्या खराब लांबीची दुरुस्तीची कामे रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

उर्वरित ६ रस्ते योजनाबाह्य असल्यामुळे स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत लोकप्रतिनिधींनी सदर कामे सुचविल्यास व न्याय मंजूरी प्राप्त झाल्यास सदर रस्त्यांची कामे करण्याबाबत जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेडखळे-ग्रुप ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील केळवडे-पेंडखळे धनगरवाडीसाठी रस्त्याचे काम निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(११) १९६१८ (१७-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेडखळे-ग्रुप ग्रामपंचयत कार्यक्षेत्रातील केळवडे-पेंडखळे धनगरवाडीसाठी रस्त्याचे निधीअभावी अनेक वर्षापासून काम प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात दिनांक २१ फेब्रुवारी, २०१५ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी ग्रामविकास मंत्री/पालकमंत्री यांना निधी मिळण्याबाबत पत्रव्यवहार करुनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार उक्त रस्त्याकरीता निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१२-२०१५) :** (१) होय.

(२), (३) व (४) प्रश्नांकित रस्त्याची पाहणी जिल्हा परिषदे मार्फत करण्यात आली असून सद्यस्थितीत रस्ता पायवाट स्वरुपाचा आहे. नवीन रस्ता करण्याचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनेमधुन प्राप्त होणाऱ्या निधी व निकषाच्या अधिन राहून करण्याचे जिल्हा परिषदेचे प्रयत्न राहतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र प्रदेश सरपंच असोसिएशन, चाळीसगांव (जि.जळगाव) यांच्या विविध मागण्यांबाबत**

**(१२) १९७३६ (०६-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदेश सरपंच असोसिएशन, चाळीसगांव (जि.जळगाव) यांनी आपल्या विविध मागण्यांचे निवेदन दिनांक १ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा. महसूल मंत्री यांच्याकडे दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनातील मागण्यांचे स्वरुप काय आहे व त्या मागण्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-१२-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र प्रदेश सरपंच असोशिएशन चाळीसगांव यांच्या दिनांक ०१.०२.२०१५ च्या निवेदनातील मागण्या ह्या विविध विषयाशी संबंधित असल्यामुळे त्या विविध विभागास/कार्यासनास या विभागामार्फत हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत. या विभागाशी संबंधित मागण्यांवर कार्यवाही सुरु आहे.
(३) अशी बाब नाही.

---

**देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील वाडा-सडेवाडी-पायलेवाडी या रस्त्यावरील सप्तकोटेश्वर मंदिर ते पालयेवाडी येथील वहाळावर पूल बांधण्याबाबत**

**(१३) २०३५५ (१७-०८-२०१५). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील वाडा-सडेवाडी-पायलेवाडी या रस्त्यावरील सप्तकोटेश्वर मंदिर ते पालयेवाडी येथील वहाळावर छोटा पूल बांधण्यात यावा व सदरहू रस्त्याचे काम हाती घेण्यात यावे म्हणून तरुण उत्साही मंडळ, पायलेवाडी यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, कणकवली, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, सिंधुदुर्ग, उपअभियंता, जिल्हापरिषद, बांधकाम, उपविभाग, देवगड आदीकडे मागील ५ वर्षापासून लेखी निवेदनाद्वारे सातत्याने मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली यांनी सदरहू कामाचा प्रस्ताव २५ लाख ९९ हजार ५६३ अंदाजीत खर्चाचा सविस्तर प्रस्ताव जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांचेकडे दिनांक २९ जून, २०१३ रोजी सादर केलेला होता, हे ही खरे आहे काय,
(३) शासनाच्या २५१५ योजनेअंतर्गत सदरहू कामासाठी अनुदान मंजूर करुन सदरहू काम तातडीने हाती घेवून पूर्ण करण्यात यावे, अशा आशयांच्या मागणीचे एक निवेदन तत्कालीन मुख्यमंत्री यांना दिनांक २० जुलै, २०१३ रोजी काही लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) सन २०१३ चे पहिल्या अधिवेशनात काही सन्माननीय सदस्यांनी कपात सुचना उपस्थित केल्यानंतर शासनाच्या वतीने सदरहू कपात सुचनेला उत्तर देताना, सदर काम, निधी व

निकर्षांच्या अधिन राहून उचित योजनेंमधून हाती घेण्याचे नियोजन आहे, असे प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांनी दिनांक १८ ऑक्टोबर, २०१४ रोजीच्या पत्रान्वये संबंधित सदस्यांना कळविलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू कामासाठी आजमितीस निधी उपलब्ध करुन हे काम सत्वर हाती घेवून पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) अद्यापी सदरहू कामास निधी उपलब्ध करुन काम सुरु करण्यात आले नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१२-२०१५) :** (१) ते (४) होय.
(५) व (६) प्रश्नांकित रस्ता हा रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ नुसार ग्रामीण मार्ग क्र. ५१ असून त्याचे आराखडयातील नाव ग्रा.मा.क्र. ५० ते पालयेवाडी सप्तक्रोटेश्वर रस्ता असे आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी कि.मी १.८१० इतकी आहे. त्यापैकी १.११० कि.मी लांबी खडीच्या पृष्ठभागाची असून पुढील ०.७०० कि.मी. लांबी पायवाटेच्या स्वरुपाची आहे.

१.११० ते १.३२० कि.मी लांबीमधील मातीकाम सन २०१३-१४ करण्यात आले आहे. तसेच सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी लोकप्रतिनिधीकडून सूचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने सडेवाडी पायलेवाडी येथे रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्यासाठी निधी मंजूर करण्यात आलेला आहे. ०.४९० कि.मी. लांबीचा भाग डोंगराळ व चढउताराचा आहे. प्रस्तावित रस्त्याच्या जागेत शेतकऱ्यांच्या हापूस आंब्याच्या मोठया बागा असल्याने या जागेचे भूसंपादन होवू शकलेले नाही. त्यामुळे पुलाचे बांधकाम झाले तरी पुढील जोडरस्ता नसल्याने या पुलाचा ग्रामस्थांना उपयोग होणार नाही.

सद्यस्थितीत पायलेवाडीतील लोकसंख्या ६५ इतकी असून त्यातील अर्धे अधिक लोक परगावी राहतात. येथील मोजक्या लोकांना तालुक्याच्या ठिकाणी येण्याजाण्यासाठी ग्रामा. क्र. ५०,४६, व ४८ हे बारमाही वाहतूकीचे पर्यायी मार्ग उपलब्ध आहेत. या रस्त्यावरुन दिवसातून तीन वेळा एस.टी. बसच्या फेऱ्या सुरु आहेत.

---

## पंचायत समिती खामगांव (जि.बुलढाणा) अंतर्गत असलेल्या ग्रामसेवकांचे रिक्त पदे भरण्याबाबत

**(१४) २१६६६ (१७-०८-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंचायत समिती खामगांव (जि.बुलढाणा) अंतर्गत किती ग्रामसेवकांच्या जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जागा रिक्त असल्यामुळे एका ग्रामसेवकाला ३-३ गांवाचा अतिरिक्त प्रभार देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एका ग्रामसेवकाला अतिरिक्त प्रभार दिल्यामुळे त्यांच्या मुळ गांवातील विकास कामांना दिरंगाई होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, बँकांचे कर्ज काढण्याकरीता शासनाचे इतर दाखले मिळण्यासाठी शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, ग्रामसेवकांच्या परिक्षा पूर्ण होऊन सुध्दा त्यांना नियुक्त्या दिलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-१२-२०१५) :** (१) पंचायत समिती, खामगांव अंतर्गत ग्रामसेवक संवर्गाच्या ७ जागा रिक्त आहेत.
(२) पंचायत समिती, खामगांव अंतर्गत एकूण ९६ ग्रामपंचायती असून ६८ ग्रामसेवकांची पदे मंजूर आहेत. माहे मे, २०१५ अखेर पंचायत समिती खामगांव अंतर्गत रिक्त १४ पदांपैकी कंत्राटी ग्रामसेवकांचे पायाभूत प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर ५ कंत्राटी ग्रामसेवकांना व आंतरजिल्हा बदलीने २ ग्रामसेवकांना अशा एकूण ७ ग्रामसेवकांना पंचायत समिती खामगांव अंतर्गत पदस्थापना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार सद्यस्थितीत ७ ग्रामसेवकांची पदे रिक्त असल्याने गावातील विकास कामे तसेच ग्रामपंचायतींचा कारभार सुरळीत चालण्यासाठी ७ हलका कार्यभार असलेलया ग्रामपंचायतींचा अतिरिक्त कार्यभार इतर ग्रामसेवकांकडे देण्यात आला आहे.
(३) नाही.
(४) नाही, अशी तक्रार प्राप्त नाही.
(५) नाही, पाच कंत्राटी ग्रामसेवकांना पदस्थापना देण्यात आली आहे.

---

### पाथरी तालुक्यातील कॅनॉल लगत मुरुंम उत्खननाबाबत

**(१५) २२८३९ (१४-०८-२०१५). श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाथरी तालुक्यातील कॅनॉल लगत मुरुंम उत्खनन झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिकार नसतानाही जायकवाडी विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित ठेकेदारांना उत्खननाची परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) संबंधित अधिकाऱ्यावर अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) नाही.
(२) नाही.
संपादित जमिनीमध्ये नव्याने उत्खनन केलेले नसून महसूल व वन विभागाचे परिपत्रक दि.१५ डिसेंबर, २००३ मधील निर्देशानुसार कालव्याच्या खोदकामातुन काढलेला मलबा संपादित जागेमध्य (Excavated spoil) च्या स्वरुपात कालव्याच्या दोन्ही बाजूंच्या संपादित

जमिनीवर आहे याबाबतचे स्वामित्व शुल्क स्विकारुन तो उचलण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) होय,

जिल्हाधिकारी परभणी यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने याबाबत क्षेत्रिय कार्यायाकडून संबंधित जिल्हाधिकारी यांना दि.२०/६/२०१५ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील खारपट्टा जमिनीतील अनेक प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१६) २३०९८ (१४-०८-२०१५). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील खारपाणपट्टातील सिंचन पध्दतीतील बदलांना मंजुरी मिळून एक वर्ष झाले तरी अद्यापपर्यंत अंदाजपत्रकापासून निविदा प्रक्रिया आदी कोणत्याही कामांना पाटबंधारे विभागाने प्रारंभ केलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला जिल्ह्यात १ लाख ९३ हजार हेक्टर जमिनीवर खारपाणपट्टा पसरलेला असून हा सर्व पट्टा पूर्ण नदीच्या दोन्ही पात्रालगत पसरलेला आहे, या जमिनींमध्ये क्षाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पूर्णा नदीवरील तेल्हारा तालुक्यातील बांधण्यात येणाऱ्या नेरधामणा बॅरेजचे काम ६० टक्के झाले आहे, उमा नदीवर मुर्तीजापूर तालुक्यातील उमा बॅरेजचे काम ५० टक्के झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या दोन्ही प्रकल्पांतून हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, खारपट्टा जमिनीतील असे अनेक प्रकल्प अद्यापही पूर्ण झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०९-२०१५) :** (१) अमरावती प्रदेशांतर्गत अकोला जिल्ह्यातील खारपाणपट्यातील पूर्ण बॅरक नं-२ (नेरधामणा) उमा बॅरेज व घुंगशी बॅरेज या प्रकल्पांना नियामक मंडळाची दि. ०४/१२/२०१३ चे ५४ बैठकीत कालव्या एवजी बंद पाईपलाईन (कामाचे सविस्तर, सर्व्हेक्षण, संकल्पन, बांधकाम प्रणाली कार्यान्वित करणे व ३ वर्षा पर्सत देखभाल दुरुस्ती व हस्तांतरण या अनुषंगिक बाबींसह) असा बदल करुन निविदा काढण्यास मान्यता देण्यात आली आहे. या बदलामुळे प्रकल्पाचा खर्च वाढणार आहे. त्यानुषंगाने या प्रकल्पांचे

सुधारित प्रशासकीय मान्यतांचे प्रस्तावांना सक्षम स्तरावर मान्यता प्रदान झाल्यानंतर प्रकल्पाची कामे हाती घेण्यात येतील. तसेच काटेपूर्णा बॅरेज ता. मुर्तिजापूर चे काम प्रगतीपथावर आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) होय. नेर धागणा व उमा बॅरेज या प्रकल्पातून अनुक्रमे ६९५४ हे. व ५५१० हे सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

(५) अमरावती प्रदेशाअंतर्गत खारपाणपट्टयातील पूर्णा बॅरेज नं. २ (नेरधामणा), उमा बॅरेज, घुगशी बॅरेज, काटेपूर्णा बॅरेज, शहापूर बृहत ल.पा. वाई (स) ल पा, नया अंदुरा (सं) ल.पा. कवठा बॅरेज, कवठा शेलू प्रकल्पांची बांधकामे प्रगतीपथावर आहेत.

(६) प्रकल्पपूर्ण कारण्यासाठी सक्षम स्तरावर आवश्यकतेनुसार तांत्रिक बदलास मान्यता घेवून सुधारित प्रशासकीय मान्यता घेवून उपलब्ध निधी नुसार प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बाभूळगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील बेबंळा प्रकल्पामुळे बाधीत १६ गावामध्ये २० ठिकाणी नागरी सुविधा मिळण्याबाबत**

**(१७) २३४६८ (१४-०८-२०१५). प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभूळगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील बेबंळा प्रकल्पामुळे बाधीत १६ गावाचे २० ठिकाणी पुर्नरवसीत अजुनही १०० टक्के नागरी सुविधा देण्यात आले नसल्याची बाब माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती नागरी सुविधा अजुन देणे बाकी आहे व ते पुर्ण करण्यास किती कालावधी लागणार आहे,

(३) असल्यास, नागरी सुविधा अपूर्ण असल्यामुळे या वर्षी बेबळा प्रकल्प १०० टक्के पूर्ण करणार आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) बारड, कोपरा-१ व पहुर-१ या तीन ७ गावठाणांमध्ये एकूण ४ नागरी सुविधा (स्मशानभुमी, पुरक पाणी पुरवठा योजना, अंतर्गत रस्ते व बसथांबा) प्रकल्पग्रस्तांना नव्याने मागणी केल्यानुसार प्रस्तावित असून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर जून, २०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) बेंबळा धरणाचे काम सन २००७ मध्ये पुर्ण झालेले आहे तथापी जून २०१६ मध्ये पाणीसाठा-६३.१४ टक्के करण्याचे नियोजन आहे.
(४) २४ मुळ गावठाणांपैकी धामक जि.अमरावती या अंशत: गावाचे पुनर्वसित गावठाणात स्थलांतरण झालेले नाही, घुईखेड जि.अमरावती गावठाणातील काही भाग स्थलांतरीत झाला नसल्यामुळे प्रकल्पात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करता येत नाही.

---

**कोढांर चिंचोली ते डिकसळ (ता.करमाळा) या पुल रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१८) २३८२७ (३१-०७-२०१५). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोढांरचिंचोली ते डिकसळ (ता.करमाळा) या पुल रस्त्यास सन २०१०-११ मध्ये मंजूरी मिळाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यासाठी एकूण ९ कोटी रूपये निधीची तरतूद केली गेली व यातील सुमारे ५ कोटी रुपयांचे काम झाले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, झालेल्या कामाबद्दल निकृष्ट कामाची तक्रार आल्यामुळे हे काम बंद केले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, रस्त्याचे काम अपूर्ण राहून रस्ता खराब झाल्याने नागरीकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही. कोंढारचिंचोली ते डिकसळ (ता.इंदापूर) या पूलाच्या कामास महसूल व वन विभागाकडून दि. २७/२/२००९ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी प्रदान केलेली आहे.
(२) प्रस्तुत कामाप्रित्यर्थ सन २००८-०९ या वर्षात अर्थसंकल्पिय तरतुद रु. ५ कोटी होती. त्यापैकी रु. ४.६८ कोटी किंमतीचे काम झाले आहे.
(३) केलेल्या कामाचे देयके प्राप्त न झाल्यामुळे ठेकेदाराने सदरचे काम बंद ठेवले होते.
(४) रस्ता वाहतुक योग्य आहे.
(५) दि. १८/६/२०१५ रोजी सदर रस्त्याचे काम जि.प.सोलापूर यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोढाणे धरणासह बाळगंगा, शाई, काळू आदि प्रकल्पांचे काम सुरु करण्यापूर्वी पर्यावरण विषयक परवानग्याबाबत**

**(१९) २४९०२ (१४-०८-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोढाणे धरणासह बाळगंगा, शाई, काळू आदि प्रकल्पांचे काम सुरु करण्यापूर्वी पर्यावरण विषयक परवानग्या घेतल्या नसल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, दोषींवर गुन्हे दाखल करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०९-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

बाळगंगा, शाई, काळू हे पाणीपुरवठा प्रकल्प असल्याने केंद्र शासनाच्या १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार पर्यावरण विषयक मान्यतेची आवश्यकता नाही. कोंडाणे प्रकल्पाला केंद्र शासनाच्या २००६ च्या अधिसूचनेनुसार पर्यावरण विषयक मान्यता आवश्यक होती, तथापि, आता केंद्र शासनाच्या दि. २५ जून, २०१४ च्या अधिसुचनेप्रमाणे पर्यावरण विषयक मान्यतेची आवश्यकता नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्ह्यातील मौजे भालेगांव रणगांव व मौजे तेलखेड येथील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(२०) २५४२५ (१४-०८-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे भालेगांव रणगांव व मौजे तेलखेड या रस्त्यातील १ किमी. लांबीच्या रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे या रस्त्यावरुन दुचाकी, चारचाकी वाहनधारकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे जून, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच या रस्त्यांच्या बांधकामासाठी प्रत्येकी २० लक्ष रुपये निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास ,सदर रस्त्याचे बांधकाम करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उपरोक्त रस्त्याचे बांधकाम करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.कार्यकारी अभियंता, जि.प.बां. विभाग, बुलडाणा यांना वेळोवेळी सुचित केले आहे ,हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१२-२०१५) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे. तथापि प्रश्नांकित रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली असून सद्यस्थितीत सदर रस्त्यांवर वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(४) जिल्हा परिषद बांधकाम विभाग बुलढाणा यांच्याकडे अशाप्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(५) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते.

प्रश्नांकित दोन रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या टप्प्याने करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलडाणा जिल्ह्यातील मौजे काटी ते बुर्टी येथील रस्त्याची झालेली दुरवस्था

**(२१) २५४३३ (१७-०८-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे काटी ते बुर्टी ग्रा.मा. २१ ता.नांदुरा हा १ किमी रस्ता नादुरुस्त असून या रस्त्या वरुन दुचाकी, चारचाकी, वाहनधारकांची गैरसोय होत असल्याची बाब जून, २०१५ मध्ये निदर्शनास आली असून या रस्त्याच्या मातीकाम व खडीकरण बांधकामासाठी २० लक्ष रुपये निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची मातीकाम व खडीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) उपरोक्त रस्त्याचे मातीकाम व खडीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, जि.प.बां. विभाग, बुलडाणा यांना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१२-२०१५) :** (१) व (२) सदर रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली असून सद्यस्थितीत सदर रस्त्यावर वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(३) जिल्हा परिषद बांधकाम विभाग बुलढाणा यांच्याकडे अशाप्रकारचे निवेदन आढळून येत नाही.

(४) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्याच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते.

प्रश्नांकित रस्त्यांची एकूण लांबी ५.०० कि.मी. आहे. त्यापैकी १.६०० कि.मी. अस्तित्वात नसलेली लांबी आहे. ०/६०० कि.मी. लांबीतील खडीकरणाचे काम सन २०१४-१५ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. तसेच उर्वरित ३.०० कि.मी. लांबीचे रस्त्याचे मातीकाम मुरुमीकरण झालेले असून सदर लांबीतील खडीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्याटप्प्याने करणसाचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

तसेच अस्तित्वात नसलेल्या लांबीतील नवीन काम प्रस्तावति करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास जिल्हा परिषदेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यातील गोकसांवगी ता.मालेगाव येथे पात्र मंजुर ३० लाभार्थींना इंदिरा आवारात योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(२२) २५७०८ (१७-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील गोकसांवगी तालुका मालेगांव येथे जवळपास ३० लाभार्थींना इंदिरा आवास योजने अंतर्गत घरकुले मंजुर करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थींच्या मालकीच्या स्वत:च्या जागेची ग्रामसचिवांनी मोजमाप करुन त्यांच्या जागेचा टॅक्स सुध्दा घेवून पावत्या दिल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर लाभार्थींना त्यांच्या जागेचा नमुना ८ अ देण्यात टाळाटाळ होत असल्यामुळे लाभार्थी घरकुलाचे लाभापासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात गटविकास अधिकारी मालेगांव यांच्याकडे दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-१२-२०१५) :** (१) होय.

परंतु, सन २०१४-१५ मध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत ग्रामपंचायत गोकसावंगी मधील १४ लाभार्थ्यांना घरकुले मंजुर करण्यात आली आहेत.

(२) होय.

(३) नाही.

(४) होय.

तथापि, तक्रार अर्ज नसून नमूना ८-अ देण्यासंदर्भात लाभार्थ्यांनी गट विकास अधिकारी यांचेकडे दि. २६.३.२०१५ रोजी विनंती अर्ज कलेला आहे.

(५) गट विकास अधिकारी, मालेगांव यांनी संबंधीत सचिव, रिधोरा यांना लाभार्थ्यांना घरकुलाच्या अनुदानाच्या वाटपाच्या सुचना दिलेल्या आहेत. सन २०१४-१५ मध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत ग्रामपंचायत गोकसावंगी मधील १४ लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करण्यात आलेली

आहेत. या १४ लाभार्थ्यांपैकी १० लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम पूर्ण केली असून त्यांना पूर्ण रक्कम अदा करण्यात आलेली आहे. उर्वरित ४ लाभार्थ्यांना घरकुलाचे बांधकाम प्रगतीपथावर आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेडगाव ते पाटे, (ता.चांदवड, जि.नाशिक) या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(२३) २६०१२ (१७-०८-२०१५). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेडगाव ते पाटे, ता.चांदवड, जि.नाशिक या रस्त्याची अतिशय दुरवस्था झालेले असून देखील याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या रस्त्याचे काम हे तातडीने करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१२-२०१५) :** (१) रेडगाव ते पाटे या रस्त्याची दरावस्था झाली आहे हे खरे आहे.
(२) रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार रेडगाव ते पाट हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. २६ दर्जाचा असुन सदर रस्त्याची एकूण लांबी २.०० कि.मी. आहे. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक बिगर आदिवासी योजना ३०५४ मधुन रु. ५०.०० लक्षचे काम प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरपणा (जि.चंद्रपूर) तालुकयामधील पकडीगुड्डम - मरकागोंदी धरणाचे पाणी शेतसिंचन कार्यासाठी न वापरता स्थानिक खाजगी उद्योगांना देण्यात येत असल्याबाबत**

**(२४) २६४१० (१७-०९-२०१५). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरपणा (जि.चंद्रपूर) तालुक्यामधील पकडीगुड्डम - मरकागोंदी धरणाचे पाणी शेतसिंचन कार्यासाठी न वापरता स्थानिक खाजगी उद्योगांना देण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पकडीगुड्डम - मरकागोंदी धरणाच्या सिंचनाखाली येणारे लाभार्थी क्षेत्र २८६०.०० एवढे सिंचनाखाली न आल्याचे सन २०१५ चे माहे जानेवारी महिन्यात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धरणातील पाणी शेतक-यांऐवजी खाजगी कंपन्यांना वळवले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंपणीवर कार्यवाही करण्यात आली आहे काय वा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सिंचना अभावी झालेल्या नुकसानाची भरपाई देण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, त्यावरील सर्वसाधारण कारणे काय आहेत व उपाययोजना कोणती ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५) :** (१) नाही.

खाजगी उद्योगांना ३.०३ दलघमी पाणीसाठा सन १९९९ मध्ये देण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.

(२) नाही.

सन २०१४-१५ मध्ये अत्यल्प पाऊस झाल्यामुळे ६६१ हेक्टर क्षेत्रात खरीप सिंचन करण्यात आले. रब्बी हंगामात सिंचनाकरीता धरणात पूरेसे पाणी नसल्यामुहे रब्बी सिंचन करण्यात आले नाही.

(३) सन १९९९ मध्ये ३.०३ दलघमी पाणी मराठा सिमेंट कंपनीकरिता शासनाकडून आरक्षीत करण्यात आले आहे. याशिवाय सोनुर्ली प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेकरिता ०.५३ दलघमी पाणी आरक्षण मंजूर करण्यात आले आहे. या बिगर आरक्षणामुळे ९४३ हे. सिंचन क्षेत्र पुच्छ भागात कमी झाले आहे.

(४) कंपनीला मंजूर केलेले पाणी आरक्षण हे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिरण अधिनियम २००५ च्या कलम ३१ ख व ३१ ग अनुसार दिनपांक १७.९.२०१० पूर्वीचे असल्यामुळे ते वैध आहेत व कायमस्वरुपी वैध ठेवायचे असल्यामुळे कंपनीवर कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

(५) साडव्याची उंची वाढवून पाणी साठा पुनर्स्थापनेबाबत कार्यवाही नियोजित आहे.

---

## नागपूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या नियोजनाच्या अभावामुळे गत दोन वर्षापूर्वीच्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या २७ कामाच्या निविदा प्रलंबित असल्याबाबत

**(२५) २६४५७ (१७-०९-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या नियोजनाच्या अभावामुळे गत दोन वर्षापूर्वीच्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या २७ कामाच्या निविदा अद्यापपर्यंत निघाले नसल्यामुळे शासनाचा ४ कोटीचा निधी परत जाणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यावेळी अतिवृष्टी व पुरामुळे जिल्ह्यातील १९५६ कि.मी. लांबीचे ८०३ रस्ते नादुरुस्त झाले तर गौण खनिजाच्या वाहतुकीमुळे १३१५ किमी लांबीचे २६१ रस्ते नादुरुस्त झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्याच्या दुरुस्तीकरीता ३७० कोटीची तर पुरग्रस्त गावातील रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता १५७ कोटी ६७ लाखांची मागणी राज्य शासनाकडे त्यावेळी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निधीपैकी ३२ कोटी निधी गेल्यावर्षी प्राप्त झाला असून त्यातून १९७ रस्त्याची कामे करावयाची होती, परंतु बांधकाम विभागाने वेळीच नियोजन न केल्यामुळे २७ कामाच्या निविदा अद्यापपर्यंत निघाल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या २७ कामाच्या निविदा यावर्षी काढण्यात येणार आहे काय व त्याचा कालावधी काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) आतिवृष्टीमुळे नादुरुस्त झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी १५८.६८ कोटी निधीची जिल्हा परिषदेची मागणी होती. तथापि सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी अतिवृष्टीने क्षतीग्रस्त झालेल्या जिल्हा परिषदांच्या अखत्यारीतील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता एकूण र ४०३.०० कोटी निधी प्राप्त झाला होता. अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त झालेल्या जिल्हयातील रस्ते पुलांबाबत आढावा घेवून त्या आधारे नागपूर जिल्हा परिषदेस रु. ३२.४४ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

तर गौण खनिजाच्या वाहतुकीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी रु २१८.५६ कोटी निधीची मागणी खनिज विकास निधीमधून मिळण्याबाबत जिल्हाधिकारी , नागपूर यांच्याकडे प्रस्ताव जिल्हा परिषदेमार्फत सादर केलेला आहे. सदर प्रस्तावास अद्याप मंजूरी मिळालेली नाही.
(४) हे खरे नाही. निविदा कार्यवाही सन २०१४-१५ मध्ये पूर्ण करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात व जिल्हयात ग्रामपंचायतींना जनसुविधा व राजीव गांधी सक्षमीकरण अभियान कार्यक्रमातून ग्रामपंचायत भवन बांधकामाबाबत

**(२६) २६४५९ (१७-०८-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात व जिल्हयात ग्रामपंचायतींना जनसुविधा व राजीव गांधी सक्षमीकरण अभियान कार्यक्रमातून ग्रामपंचायत भवन बांधकामासाठी अनुक्रमे रु.१० लक्ष व रु.१२ लक्ष तसेच स्मशानभूमी विकास कामांसाठी रु.१० लक्ष आर्थिक मर्यादा निश्चित केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्हा नियोजन समिती मार्फत दिनांक ३० जुन, २०१४ रोजीच्या सभेत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार ग्रामपंचायत भवन बांधकामासाठी रु.२५ लक्ष आर्थिक मर्यादा आणि स्मशानभूमी विकास कामांसाठी आर्थिक मर्यादा वाढविण्याबाबतच्या शिफारशीच्या अनुषंगाने शासनस्तरावर प्रस्ताव सादर केल्या आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-१२-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर योजनेंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम करणे यासाठी रु. १०.०० लक्ष ऐवजी रु. १२.०० लक्ष इतका निधी मंजूर करण्यास या विभागाचा शासन निर्णय क्र. जनसु २०१५/प्र.क्र.५९/यो-६ दि. ३१ ऑक्टोबर, २०१५ या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## यवतमाळ येथे इस्त्रायली प्रकल्प राबविण्याबाबत

**(२७) २६६४४ (१७-०८-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ येथे इस्त्रायली प्रकल्प राबविण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०९-२०१५) :** (१) नाही. तथापि यवतमाळ जिल्हयातील बेंबळा नदी प्रकल्पाचा घटक भाग असलेल्या डेहणी उपसा सिंचन योजना ही इस्त्रायली प्रगत तंत्रज्ञानावर आधारीत पुर्णत: स्वयंचलीत योजनेच्या कामास सन २००७ मध्ये सुरुवात करण्यात आली आहे.
(२) डेहणी योजनेचे काम प्रगतीत असून योजना जुन २०१७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उजनी धरणापासून सोलापूरपर्यंत भीमा नदीवर २१ बंधारे असून या बंधा-यांच्या दरवाजांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२८) २९३०८ (१४-०१-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उजनी धरणापासून सोलापूरपर्यंत भीमा नदीवर २१ बंधारे असून या बंधा-यांचे दरवाजे मागील १३ वर्षापासून बदललेले नसल्याने त्यांची दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दरवाजे बदलण्याबाबतचा प्रस्ताव अंदाजपत्रकासह मंजुरीसाठी पुणे कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता ते सर्व सात कोटीचे अंदाजपत्रक रिजेक्ट करण्यात आले आहे या बंधा-यांमुळे आषाढी यात्रेवेळी सोडलेले पाणी या बंधा-यात साठविता आले नाही व एका महिन्यात बंधारे कोरडे पडले याकारणास्तव नागरिकांची, पशुधनाची पाण्याअभावी गैरसोय होत असल्यामुळे त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) होय.
(२) निधी उपलब्धतेनुसार बर्ग्यांची दुरुस्ती वा नविन बर्गे घेणेची कार्यवाही करणे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बागलाण (जि.नाशिक) तालुक्यातील केळझर धरणातून मोठया प्रमाणात पाण्याची गळती होत असल्याबाबत**

**(२९) ३०२५१ (१४-०१-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बागलाण (जि.नाशिक) तालुक्यातील केळझर धरणातून मोठया प्रमाणात पाण्याची गळती होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या पाहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, तदनुसार सदर धरणातून होणारी पाण्याची गळती थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जत व सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यातील दुष्काळी भागाला सांगली जिल्ह्यातील म्हैसाळ धरणातील काळव्यांच्या माध्यमातुन पाणी देण्याबाबत**

**(३०) ३०२८७ (२२-०१-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत व सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यातील दुष्काळी भागाला सांगली जिल्ह्यातील म्हैसाळ धरणातील काळव्यांच्या माध्यमातुन पाणी देण्याबाबत मंजूरी देवून काम सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, सदर दुष्काळी भागातील कालव्यांची कामे कोणत्या कंपनीला देण्यात आली आहेत व ते कधीपर्यंत पूर्ण करण्याचा करार करण्यात आलेला आहे, तसेच सदर कालव्यांच्या कामाकरिता आतापर्यंत किती निधी खर्च करण्यात आलेला आहे,
(४) संबंधित कंपनी कंत्राटदाराने वेळेत कामे पूर्ण केली नसल्यास, त्यांच्यावर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) होय. कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत म्हैसाळ उपसा सिंचन योजना असून योजनेचे काम सुरु आहे. जत सांगोला या तालुक्यांचे लाभक्षेत्र या योजनेत अंतर्भूत आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) सदर दुष्काळी भागातील कालव्याची कामे एकूण ५५ कंत्राटामार्फत देण्यात आलेली आहेत व कामे सर्वसाधारणपणे दि. ३१.३.२००३ ते दि. ३१.४.२०१६ या कालावधीत पूर्ण करण्याचा करार करण्यात आलेला आहे. बऱ्याच निविदांना मुदतवाढ देण्याची महामंडळ स्तरावर कार्यवाही सुरु आहे. सदर कालव्याच्या कामाकरिता आतापर्यंत एकूण रुपये २९६.६५ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे.
(४) अपूरा निधी असल्याने कामे पूर्ण करणेत अडचणी आहेत.
(५) अपूरा निधी.

---

### महाराष्ट्र व तेलंगणा या राज्याच्या संयुक्त चेक डॅमच्या तेलंगणा राज्याच्या प्रस्तावाबाबत

**(३१) ३२२४० (२२-०१-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र व तेलंगाणा या राज्याच्या संयुक्त चेक डॅमच्या तेलंगाणा राज्याच्या प्रस्तावाबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(२) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) होय.
(२) तेलंगणा राज्याने (पूर्वीच्या आंध्रप्रदेश) वर्धा-पैनगंगा नदीचे संगमाखाली तुमडी हेटी येथे बॅरेज बांधून वळण व उपसा योजनेद्वारे १६० अघफु पाणी वापराचा प्रस्ताव दिला होता.

यामध्ये पाण्याच्या फुगवट्या मध्ये महाराष्ट्रातील २०९९ हे क्षेत्र बुडीत होत होते. (नदी पात्रातील १३५८ हेक्टर + नदीकाठचे ७४१ हेक्टर.)

या प्रस्तावास बुडीत क्षेत्र विचारात घेऊन महाराष्ट्राने विरोध दर्शविला होता. सदर विरोध विचारात घेऊन आता तेलंगणा राज्याने मुळ बंधाऱ्याची उंची ४ मी. ने कमी करणे व मेडीगट्टा गावाजवळ दुसरा बंधरा बांधण्याचा प्रस्ताव दिला आहे.

(३) प्रस्तावामुळे होणारे महाराष्ट्राचे बुडीत क्षेत्र व महाराष्ट्राचे फायदे यांचा अभ्यास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील पूर्णा नदीवर पोटा उच्च पातळी बंधारा व जोड परळी बंधारा हे उच्च पातळी दर्जाचे बंधारे बांधण्याबाबत**

**(३२) ३२६८६ (२२-०१-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील पूर्णा नदीवर पोटा उच्च पातळी बंधारा व जोड परळी बंधारा हे उच्च पातळी दर्जाचे बंधारे बांधण्यासाठी संबंधित लोकप्रतिनिधी यांनी मा. जलसंपदा मंत्री यांना दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी पत्रान्वये निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनांना पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र मिळूनही अंदाज पत्रकाच्या कामास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अंदाज पत्रक सत्वर तयार करुन निधी मंजूर होवून उक्त बंधाऱ्याचे काम सुरु करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) या योजनांची प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने अंदाजपत्रके तयार करण्यात आली असून क्षेत्रीय स्तरावर तपासणीत आहेत.

(३) राज्याची उपलब्ध साधनसंपत्ती विखुरली जाऊ नये व सुरु असलेल्या बांधकामाधीन परिणाम होऊ नये याकरिता मा.राज्यपाल महोदयांच्या निदेशान्वये २५० हेक्टर वरील नवीन प्रकल्प घेण्यास मान्यता नाही. मा.राज्यपाल यांच्या मान्यतेशिवाय प्रकल्पास प्रशासकिय मान्यता देणे शक्य होणार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे पिंपळगाव खांड (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथे बांधण्यात आलेल्या मध्यम प्रकल्पात पाणी साठविल्यामुळे कोतुळकडे जाणारा मुळा नदीवरील पूलाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३३) ३३०३५ (१५-०१-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पिंपळगाव खांड (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथे बांधण्यात आलेल्या मध्यम प्रकल्पात पाणी साठविल्यामुळे कोतुळकडे जाणारा मुळा नदीवरील पूल पाण्याखाली गेल्याने माहे जून, २०१५ पासून सदर पुलावरुन होणारी वाहतुक बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार सदर पुलावरुन वाहतुक पुर्ववत होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
सदर पुलावरुन २८.१.२०१६ पासून वाहतुक सुरु आहे.
(२) होय.
(३) व (४) सदर पुलावरुन वाहतुक बंद असताना पिंपळगाव खांड ते धामणगाव पाट कोतूळ या पर्यायी मार्गाने वाहतुक सुरु होती.
सदर प्रकल्पाचा सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव शासन स्तरावर छाननीत आहे. सुप्रमा मान्यतेनंतर पुलाचे काम हाती घेण्यात येईल.

---

**अकोला जिल्ह्यातील काटेपूर्णा प्रकल्पावरील महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पाअंतर्गत सहकारी पाणी वापर संस्थांच्या कार्यक्षेत्रात वितरण व्यवस्था पुन:स्थपित करण्याच्या कामासाठी निधी प्रलंबित असल्याबाबत**

**(३४) ३३८८० (१५-०१-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील काटेपूर्णा प्रकल्पावरील महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पाअंतर्गत सहकारी पाणी वापर संस्थांचे कार्यक्षेत्रात वितरण व्यवस्था पुन:स्थपित करण्याच्या कामासाठी शासनपत्र दिनांक २५ नोव्हेंबर, २०१४ अन्वये ३८७.५० लक्ष निधी मंजूर केला होता, हे खरे आहे काय,
(२) उक्त, मंजूरी केलेल्या निधीचे सन २०१४-१५ मध्ये मात्र प्रत्यक्षात वितरण करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निधी अभावी कंत्राटदारांच्या कामाचे देयक अदा न झाल्याने कंत्राटदारांनी कामे बंद केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाकडून मंजूर निधी प्रत्यक्षात वितरीत करण्याचे काय नियोजन आहे,
(५) तसेच तातडीने निधीची उपलब्धता करुन देण्यात येईल काय ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.

(४) महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पाची मुदत दि. २८.३.२०१४ रोजी संपलेली आहे. त्यानंतर थकीत असलेली देयके अदा करण्यासाठी सक्षम स्तरावर मान्यता घेऊन देयके अदा करावयाची कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(५) मान्यतेनंतर कार्यवाही करण्यांत येईल.

---

### राधानगरी तालुक्यातील तुळशी धरणावरील विद्युत यंत्रणा नादुरस्त असल्याबाबत

**(३५) ३४४३२ (१४-०१-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी तालुक्यातील तुळशी धरणावरील विद्युत यंत्रणा गेली ३ वर्षे बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्मचारी व अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळे विद्युत यंत्रणा बंद पडल्याने धरण परिसर अंधारमय झाला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विद्युत यंत्रणेकडे दुर्लक्ष करणाऱ्या कर्मचारी अधिकारी यांचेवर कारवाई करून नवीन विद्युत यंत्रणा विकसित करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुक्यातील तुकाई या पाटबंधारे योजनेची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३६) ३४४५२ (१४-०१-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुक्यातील साकळाई तसेच कर्जत तालुक्यातील तुकाई या पाटबंधारे योजनांच्या कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,
(२) या योजनाच्या कामास केव्हा सुरुवात करण्यात आली व त्यावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,
(३) या योजनेच्या कामास विलंब होण्याची कारणे काय आहेत व या योजनेची कामे पूर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) कुकडी प्रकल्पात उपलब्ध असलेल्या संपुर्ण पाण्याचे नियोजन या पुर्वीच झाले असल्याने व या योजनेसाठी पाणी उपलब्ध नसल्याने सदर योजनेचे काम हाती घेण्याचे नियोजन नाही. मा. राज्यपाल यांच्या निर्देशानुसार नवीन प्रकल्प हाती घेण्यास अनुमती नाही.

दुसऱ्या कृष्णा पाणी तंटा लवादाच्या अंतिम निर्णयानंतर ज्यादा पाणी उपलब्ध झाल्यास व तद्नंतर महाराष्ट्र जल नियमन प्राधिकरण यांचेकडून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर या मागणीचा विचार करणे शक्य होईल.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील धामणी सर्प नाला व नागणवाडी हे प्रकल्प प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसानाअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(३७) ३५३५६ (२०-०१-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील धामणी सर्प नाला व नागणवाडी हे प्रकल्प प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसानाअभावी गेली कित्येक वर्ष प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास प्रकल्प वर्षानुवर्षे प्रलंबित असल्यामुळे प्रकल्पाची किमंत मूळ किमंतीच्या ४ ते ५ पटीने वाढलेला असून शेतकऱ्याना याप्रकल्पाचा लाभ होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास सदर प्रकल्पाच्या पुनर्वसनासाठी आवश्यक त्या जमिनी प्रकल्पग्रस्तांना तात्काळ देण्यासाठी व आर्थिक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) या तिन्ही प्रकपांच्या प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या पुनर्वसनासाठी जमिनी देण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी व भू-संपादन अधिकारी यांच्यामार्फत कार्यवाही सुरु आहे. सन २०१५-२०१६ मध्ये धामणी मध्यम प्रकल्पासाठी रु.४०० लक्ष, सर्पनाला मध्यम प्रकल्पासाठी रु.७५० लक्ष व नागणवाडी लघु प्रकल्पासाठी रु.१० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पटवर्धनकुरोली (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील भिमानदीवरील पुलावर संरक्षक कठडे नसल्याने वाहतुकीस निर्माण झालेला धोका**

**(३८) ३५३७७ (२०-०१-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पटवर्धनकुरोली (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथे भिमा नदीवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे संरक्षण कठडे नष्ट झाल्याने स्थानिक नागरीक, शालेय विद्यार्थ्यांना वाहतुकीस धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीत काय आढळून आले व तद्नुसार बंधा-याचे संरक्षण कठडे पुर्ववत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) बंधाऱ्याच्या माथा स्लॅब वर दोन्ही बाजूस धरुन एकूण ३६४ आर.सी.सी. संरक्षक दगड आहेत. त्यापैकी १९३ आ.सी.सी. दगड सुस्थितीत नाहीत. सन २०१६-१७ या वर्षाच्या देखभाल दुरुस्ती अंतर्गत सुस्थितीत नसलेल्या १९३ आर.सी.सी. संरक्षक दगडांची दुरुस्ती करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंजा तलाव लघु सिंचन (ता.सालकेसा, जि.गोंदिया) प्रकल्पात जमिनी संपादीत केलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत**

**(३९) ३५३८९ (१५-०१-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील सालकेसा तालुक्यातील आंजा तलाव लघु सिंचन प्रकल्प सन १९९१ मध्ये पूर्ण करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) या प्रकल्पात २३ कास्तकारांची जमिनी संपादीत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील २४ वर्षापासून संपादीत झालेल्या शेतक-यांना जमिनीचा मोबदला मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतक-यांना जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटबंधारे उपविभाग, चोपडा अंतर्गत शाखेत अभियंता दप्तर कारकून, कालवा निरीक्षक व इतर कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४०) ३५४४८ (२०-०१-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील चोपडा तालुक्यातील पाटबंधारे उपविभाग, चोपडा अंतर्गत शाखा अभियंता दप्तर कारकून, कालवा निरीक्षक व इतर कर्मचा-यांची आकृतीबंधाप्रमाणे एकूण ९७ कर्मचा-यांपैकी फक्त ११ पदे कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य कालवा ४२ कि मी व कार्यक्षेत्र २८००० हेक्टर तसेच त्यात कालव/वितरिका/उप वितरकांसह ३०० किमी अंदाजे अंतर असून त्यावर १४८८८ हे क्षेत्र व ४० गावांचे सिंचन लाभार्थी येतात, हे ही खरे आहे काय,

(३) यामुळे शासनाचे मोठे आर्थिक नुकसान, पाण्याचा अपव्यय, पाणीपट्टी वसूली, वृक्षतोड व कालव्यावरील देखभाल व्यवस्थित होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त रिक्त पदे केव्हा भरण्यात येणार आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०२-२०१६) :** (१) पाटबंधारे उपविभाग चोपडा अंतर्गत शाखा अभियंता, दप्तर कारकून, कालवा निरिक्षक व इतर कर्मचाऱ्यांची आकृती बंधानुसार मंजूर संख्या ३५ पदे इतकी आहे. माहे जानेवारी २०१६ अखेर त्यापैकी २५ पदे कार्यरत आहेत.

(२) पाटबंधारे उपविभाग, चोपडा यां उपविभागाकडे उर्ध्व तापी हतनूर प्रकल्पाच्या उजवा कालव्यावरील सा.क्र. ५०/१०० कि.मी. ते सा.क्र. ९२/१०० कि.मी. असा ४२ कि.मी. लांबीचा मुख्य कालवा, २५ वितरीका व ८५ उपवितरीका असून याची एकूण २९३ कि.मी. लांबीतील ५५ गावातील १५५४९ हेक्टर सिंचनक्षेत्र आहे.

(३) हे खरे नाही.

(४) कनिष्ठ अभियंत्यांची १९६ रिक्त पदे भरण्यात तापी पाटबंधारे विकास महामंडळाला शासनाने मान्यता दिली असून, रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. इतर रिक्त पदांपैकी ५०% किंवा एकूण संवर्गाच्या ४% पदे भरण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यानुसार कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**पुळुज (जि.सोलापूर) येथील भिमा नदीवर बांधण्यात आलेल्या बंधा-याची दारे नादुरूस्त असल्यामुळे पाणी साठा होत नसल्याबाबत**

**(४१) ३५५४३ (२०-०१-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात पुळुज येथे भिमा नदीवर बांधण्यात आलेल्या बंधा-याची दारे नादुरुस्त असल्याने सदर बंधा-यात पाणी साठा होत नसल्याचे माहे एप्रिल,२०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधा-याची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर पाझर तलावाची गळती थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच सदर गळतीस जबाबदार ठेकेदारावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) को.प.बंधाऱ्याच्या एकूण ६९६ बर्ग्यांपैकी ६५६ बर्गे नादुरुस्त आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार दुरुस्तीची कामे करण्याचे नियोजीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील कुतरकुंड लघुपाटबंधारे प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४२) ३५९१० (२०-०१-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील कुतरकुंड लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या कामास १० वर्षापुर्वी सुरुवात करुन सदर प्रकल्पाचे काम अद्याप अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,
(३) तसेच सदर प्रकल्पाचे अपूर्ण काम तातडीने पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे,
शहापूर तालुक्यातील नामपाडा प्रकल्पाचे स्थानिक नांव कुतरकुंड आहे. सदर प्रकल्पाचे काम फेब्रुवारी, २०१० मध्ये सुरु करण्यात आले होते. वन प्रस्तावास तत्वत: मान्यता मिळाली असून अंतिम मान्यता न मिळाल्याने एप्रिल, २०१२ पासून काम बंद आहे.
(३) वन व पर्यावरण विभागाच्या तत्वत: मान्यतेच्या पत्रातील सर्व अटींची पुर्तता करुन अंतिम मान्यतेचा प्रस्ताव दिनांक २७.०१.२०१६ रोजी वन विभाग, शहापूर यांसकडे सादर करण्यात आलेला आहे. अंतीम मान्यतेनंतर प्रकल्पाचे काम सुरु करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयातील हातनुर प्रकल्पांतर्गत केलेल्या कालव्यांचे मजबुतीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४३) ३६०८० (१४-०१-२०१६). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील जागतीक बँक अर्थ सहाय्यीत कार्यक्रमा अंतर्गत महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प या तापी पाटबंधारे विकास महामंडळा अंतर्गत येणा-या हातनुर प्रकल्पांतर्गत केलेल्या कालव्यांचे मजबुतीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने सदर कालव्यातून पुनश्च गळती सुरु झाल्याचे माहे ऑक्टोबर,२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठया प्रमाणात निधी खर्च करुनही कालव्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणा-या संबंधित ठेकेदाराची चौकशी करुन त्याच्या विरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उरण (जि. रायगड) तालुक्यातील खारबंदिस्तीची निगा व दुरुस्तीबाबत**

**(४४) ३६८२५ (२०-०१-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि. रायगड) तालुक्यातील खारबंदिस्तीची निगा व दुरुस्तीसाठी रक्कम रु.१५ कोटी शासनाकडून मंजूर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरण तालुक्यातील किती कामांना मंजूरी देण्यात आली आहे,

(३) असल्यास, मंजूरी देण्यात आलेल्या कामांवर आतापर्यंत किती रक्कम खर्च करण्यात आली आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) नाही.

सन २०१५-१६ साठी कोकणातील ठाणे पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदर्ग या पाच जिल्ह्यांसाठी खारबंदीस्तीची देखरेख व दुरुस्तीसाठी रु.७.४२ कोटी इतका निधी मंजूर केला आहे. यापैकी रु.३.०० कोटी इतका निधी रायगड जिल्ह्यासाठी मंजूर आहे. देखभाल व दुरुस्तीसाठी प्राप्त होणारा निधी हा तालुकानिहाय वितरीत केला जात नसून जिल्ह्यातील भरती ओहोटी व पुरामुळे नुकसान झालेल्या व तातडीने हाती घ्यावयाच्या योजनांसाठी आवश्यकतेनुसार सदर निधीचा वापर केला जातो.

(२) उरण तालुकयात एकूण ४ शासकीय खारभुमी योजना असून यापैकी खोपटा कोप्रोली. आबरे, वांरखरर या ३ खारभुमी योजनांची कामे नाबार्डनिधी अंतर्गत प्रगतीपथावर असल्याने या योजनांवर देखभाल व दुरुस्तीसाठी खर्च केला जात नाही. जुई धमकडी या खारभूमी योजनेच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामांना क्षेत्रियस्तरावर मंजूरी दिली आहे.

(३) जुई धमकडी या खारभूमी योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी रु.१२.०२ लक्ष इतका खर्च झाला आहे.

---

**केंद्र शासनाच्या एआयबीपीकडून तारळी धरण प्रकल्पातंर्गत**
**उपसा जलसिंचन योजनांना निधी देण्याबाबत**

**(४५) ३६८३९ (२०-०१-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण विधानसभा मतदारसंघामध्ये केंद्र शासनाच्या एआयबीपी मधून तारळी धरण प्रकल्पांतर्गत मौजे बांबवडे, तारळे, आवर्डे, धुमकवाडी व कोंजवडे याठिकाणी उपसा जलसिंचन योजनांना निधी देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पांतर्गत उपसा जलसचिंन योजनांची कामे करण्याकरीता केंद्र शासनाने निधी दिला आहे काय असल्यास राज्य शासनास या निधीसंदर्भात माहिती आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या एआयबीपी कडून निधी मिळाला नसल्याने या उपसा जलसिंचन योजनांची कामे बंद आहेत याची चौकशी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निकर्ष काय आहेत व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) होय,

तारळी प्रकल्प हा केंद्र शासनाचे वेगवर्धित सिंचन कार्यक्रमात अर्थसहाय्यासाठी अंतर्भूत आहे.

(२) तारळी प्रकल्पाच्या सन २०१४-१५ च्या सलगता प्रस्तावाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने सन २०१४-१५ मध्ये रु. १.०९ कोटी व सन २०१५-१६ मध्ये रु. १०.०४ कोटी असे एकुण रु. ११.१३ कोटीचे केंद्रीय सहाय्य वितरीत केले आहे. राज्य शासनाने सन २०१४-१५ मध्ये रु. २६.३४ कोटी व सन २०१५-१६ मध्ये रु. ४९.९४ कोटीचा निधी प्रकल्पासाठी उपलब्ध केला आहे.

(३) प्रकल्पासाठी केंद्र व राज्य शासनाने निधी उपलब्ध केला आहे. मौजे बांबवडे व तारळे उपसा सिंचन योजनेची कामे पूर्ण झाली आहेत. आवर्डे, धुमतवाडी व कोंजवडे या उपसा सिंचन योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिवणगाव व शेंदोळा बु.ता.तिवसा येथील सिंचन प्रकल्पाकरिता संपादित केलेल्या जमीनींचा मोबदला मिळण्याबाबत**

**(४६) ३८१५३ (२२-०१-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवणगाव व शेंदोळा बु.ता.तिवसा येथील सिंचन प्रकल्पाकरिता संपादित केलेल्या जमीनींचा वाढीव मोबदला मिळण्याबाबत मा.लोकप्रतिनिधींच्या पत्रान्वये केलेल्या विनंती नुसार उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) (अ.व.प्र.) लाभक्षेत्र क्र.२ अमरावती यांनी योग्यते कार्यवाहीसाठी कार्यकारी अभियंता, अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग, अमरावती यांना दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी कळविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिवणगाव व शेंदोळा बु.ता.तिवसा येथील सिंचन प्रकल्पाकरिता संपादित केलेल्या जमीनीच्या वाढीव मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) होय.

(२) उक्त जमिनी भूसंपदान कायद्यानुसार प्राप्त केलेल्या नसुन सरळ खरेदी द्वारे संपादन केल्या आहेत. त्यामुळे वाढीव मोबदला देणेचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या पाथरी (जि. परभणी) येथील उपविभाग क्र.६ मधील कामकाज अभियंत्यांच्या रिक्त पदामुळे प्रलंबित असल्याबाबत**

**(४७) ३८६९९ (२०-०१-२०१६). श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या पाथरी (जि. परभणी) येथील उपविभाग क्र.६ मधील कामकाज मागील ६ महिन्यांपासून अभियंत्यांची पदे रिक्त असल्यामुळे बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाथरी उपविभागात पाथरी व मानवत या दोन तालुक्यांचा समोवश असल्याने कामाचे प्रमाण अधिक असतानाही येथील अभियंत्यांची ४ पदे बराच काळ रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अभियंत्यांची पदे रिक्त असल्यामुळे कोट्यवधी रुपयांचा निधी अखर्चित राहून सर्व कामे बंद झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने अभियंत्यांची ४ पदे तातडीने भरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही. उपविभागात नियमित १ उप अभियंता कार्यरत असून शाखा अभियंता यांना अतिरिक्त कार्यभार देऊन कामकाज चालू आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. या उपविभागंतर्गत ७ सिंचन शाखा कार्यालये व १ उप विभागातील शाखाधिकारी असे एकूण ८ शाखाधिकारी पदे मंजूर आहेत. यापैकी ३ शाखाधिकारी कार्यरत आहेत. उर्वरित शाखांच अतिरिक्त कार्यभार देवून कामे करण्यात येत आहेत.

(३) हे खरे नाही. वर्ष २०१५-१६ या कालावधीतील निधी अखर्चित राहिला नाही.

(४) कनिष्ठ अभियंतांची रिक्त पदे भरण्याबाबत गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाला परवानगी दिली असून त्यानुसार कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील विविध भागात सुरु असलेल्या प्रकल्पाचे काम सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी (सुप्रमा) प्रलंबित असल्याबाबत**

**(४८) ३८७५३ (२०-०१-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील विविध भागात सुरु असलेल्या प्रकल्पाचे काम सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी (सुप्रमा) प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाच्या खर्चात वाढ होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार प्रलंबित काम तातडीने पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) नाही.

(२) होय.

(३) अकोला जिल्ह्यातील बांधकामाधीन प्रकल्पांची कामे सु.प्र.मा.अभावी प्रलंबित राहू नये म्हणून उपरोक्त प्रकल्पांवर उपलब्ध निधीनुसार वेळोवेळी प्र.मा.पेक्षा जास्त खर्चास सक्षम स्तरावरुन परवानग्या देयात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इच्छागव्हाण (ता.तळोदा, जि.नंदुरबार) लघुपाट बंधाऱ्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४९) ३९११५ (२०-०१-२०१६). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इच्छागव्हाण (ता.तळोदा, जि.नंदुरबार) लघुपाट बंधाऱ्याला (धरणाला) शासनाची मान्यता मिळाली आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्ष काम केव्हा सुरु होणार आहेत,

(३) असल्यास, सदर धरणाचे काम सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) होय

(२) व (३) इच्छागव्हाण धरणाच्या बुडीतात २६.७७ हे. वनजमिन येत असून, सद्य:स्थितीत वनजमिन प्रस्तावास मान्यतेची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. वनजमिन ताब्यात आल्यानंतर प्रत्यक्ष प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृष्णा (ता.जत, जि.सांगली) नदीचे पाणी नेण्यासाठी सुरु केलेली म्हैसाळ उपसा सिंचन योजनेची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(५०) ३९२१५ (२०-०१-२०१६). श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा (ता.जत, जि.सांगली) नदीचे पाणी नेण्यासाठी सुरु केलेली म्हैसाळ उपसा सिंचन योजनेची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावर सन २०१४-१५ सालासाठी किती निधीची उपलब्धता करण्यात आलेली आहे,

(२) सदरचा निधी दिला आहे काय तसेच निधी न दिल्यामुळे काम बंद आहे काय,

(३) लायनिंग न करता मुख्य कॅनॉल व त्यावरील बांधकाम पूर्ण करण्यासाठी किती निधी लागेल व त्याची पूर्तता करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच अंकले व खलाटी पंप हाउसचे काम केंव्हा सुरु होणार आहे व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१६) :** (१) कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाकरीता सन २०१४-१५ मध्ये सांगली जिल्ह्यासाठी रु. १३५.०० कोटी निधीची अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आली होती.

(२) यापैकी रु ३३.८२ कोटी निधी शासनाकडून वितरीत झाला असून या योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) म्हैसाळ उपसा सिंचन योजनेअंतर्गत लार्यारंग (अस्तरीकरण कामे) न करता जत तालुक्यातील मुख्य कालवा त्यावरील बांधकामे पूर्ण करण्यासाठी रु.२७२.०१ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.

(४) भू-संपादनाची प्रगतीपथावर कार्यवाही असून निधीचे उपलब्धतेनुसार या योजनेची कामे करण्याचे नियोजन आहे.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.